

# श्री ज्ञानेश्वरी
# अध्याय सातवा

या अध्यायाला ज्ञानविज्ञान योग असे नांव आहे.कर्मयोग सांख्य मार्गाइतकाच मोक्षप्रद पण स्वतंत्र व त्याहून श्रेष्ठ आहें , आणि या मार्गाचे स्वल्पाचरण जरी घडले तरी ते फुकट जात नाही, असें प्रतिपादन करून, या मार्गाच्या सिद्ध्यर्थ लागणारा इंद्रियनिग्रह कोणत्या प्रकारे करावा याचे निरूपण करण्यात आलें. पण इंद्रियनिग्रह म्हणजें केवळ बाह्य क्रिया असून ज्यासाठी इंद्रियांची ही कसतरत करावयाची त्याचा विचार अद्याप झाला नाही. कामक्रोधादि शत्रु इंद्रियांचे ठायी ठाणे देऊन ज्ञानविज्ञानाचा नाश करितात (3:40,41) म्हणून तूं इंद्रियनिग्रह करून या शत्रूना ठार कर, असें भगवंतानीच इंद्रियनिग्रहाचे प्रयोजन तिसऱ्याच अध्यायात अर्जुनास सांगितले आहें. आणि 6 व्या अध्यायात पण इंद्रियनिग्रह करून '' ज्ञानविज्ञानाने तृप्त झालेला '' (6:'8) असे त्याचे वर्णन केले आहें. म्हणून आतां ज्ञान व विज्ञान म्हणजें काय आणि परमेश्वराचे पूर्ण ज्ञान होऊन कर्मे न सोडिताही कर्मयोगातील ज्या वीधीनी अखेर निःसंशय मोक्ष मिळतो ते विधीहि सांगणे आतां ओघानेच प्राप्त झाले . तो विषय या अध्यायात सांगितला आहें . अशा प्रकारे अज्ञान ते काय व ज्ञान ते काय याच नीट उहापोह या अध्यायात केला आहे म्हणून याला ज्ञानविज्ञान योग असे नांव आहे.

यात 30 श्लोक असून त्यावर फक्त 210 ओव्या आहेत. हा लहान अध्याय आहे. यात श्लोक 5, 9,18 या श्लोकांवर पूर्ण भाष्य नाही.5व्या श्लोकांवरची टीका समर्पक नाही. त्याच प्रमाणे 44व्या ओवीचा शेवटचा दीड भाग हा 9 व्या श्लोकाच्या शेवटच्या ओळीवर टीका आहे , पण ती 11व्या श्लोकाच्या नंतर आली आहे.

त्याच प्रमाणे 50व्या ओवीत 10 व्या अध्यायाचे प्रपंच रुपी वृक्षरूपाचे बीज गोवले आहे.

## श्री ज्ञानेश्वरी
## अध्याय सातवा

**श्रीभगवानुवाच**

**मय्यसक्तमनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः।**
**असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ।।1।।**
**ज्ञानं तेऽ हं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।**
**यज्ज्ञात्वा नेह भुयोऽ न्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ।।2।।**

**श्रीभगवान म्हणाले- हे पार्था ! माझ्या ठिकाणी चित्त ठेवून, व माझाच आश्रय करुन कर्म योग आचरीत असतां तुला माझे यथा म्हणजे ज्या प्रकारे अथवा विधीने पूर्ण निःसशंय ज्ञान होइल ते ऐक. विज्ञानासहित हे ज्ञान काही शेष न ठेविता मी तुला सांगतो; जे जाणितल्याने या लोकी दुसरे काहीहि जाणावयाचे शिल्लक रहात नाही.**

आइका ! मग तो श्रीअनंतु । पार्थाते असे म्हणतु ।
पै गा ! तूं योगयुक्तु । जालासि आतां ।। 1।।
मज समग्राते जाणसी ऐसें , । आपुलिया तळहातीचे रत्न जैसे ।
तुज ज्ञान [1] सांगेन , तैसें । विज्ञानेसी [2] ।।2।। — 1 स्वरुप ज्ञान 2 प्रपंच ज्ञान
एथ विज्ञाने काय करावे ?। ऐसे घेसी जरी मनोभावे ।
तरी पै , आधी जाणावे ।तेचि लागे ।।3।।
मग ज्ञानाचिये वेळे , । झांकती जाणिवेचे डोळे[3] । — 3 प्रापंचिक ज्ञानाची जाणीव
जैसी , तीरी नाव न ढळे । टेकलीसांती [4] ।।4।। — थांबते 4.टेकली असता
तैसी , जाणीव जेथ न रिघे । विचार मागुता पाउली निघे ।
तर्कु आयणी [5] नेघे [6] । आंगी जयांच्या ।।5।। — 5 चातुर्य 6 न घेणे
अर्जुना ! तया नांव ज्ञान । येर प्रपंचु , हे विज्ञान ।
तेथ सत्यबुध्दि , ते अज्ञान [7] । हेही जाण ।।6।। — 7 प्रपंचाच्या ठीकाणी
आता अज्ञान अवघे हरपे , । विज्ञान निःशेष करपे , । — खरे वाटणे
आणि , ज्ञान ते स्वरुपे । होऊनि जाइजे ।।7।।
जेणे सांगतयाचे बोलणे खुंटे , । ऐकतयाचे व्यसन तुटे ।
हे जाणणे , साने मोठे , । उरो नेदी [8] ।।8।। — 8 उरु देत नाही
ऐसे वर्म जे गूढ , । ते किजेल [9] वाक्यारुढ । — 9 केले जाईल
जेणे थोडेन , पुरे कोड [10] । बहुत मनीचे ।।9।। — 10 इच्छा

**मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः।।3।।**

**हजारो मनुष्यात एखादाच सिद्धि मिळविण्याचा यत्न करितो; आणि प्रयत्न करणाऱ्या या अनेक सिद्ध पुरुषापैकी एखाद्यासच माझे खरे ज्ञान होते.**

पै गा ! मनुष्यांचिया सहस्त्रशां-। माजी विपाइले [1] याचि धिवसा [2] । 1 थोडे 2 इच्छा
तैसे , या धिवसेकरा [3] बहुवसा [4] ।माजी , विरळा जाणे ।।10।। 3 इच्छा करणारा 4 सर्वज्ञ
जैसा , भरलेया त्रिभुवना-। आतु , एकएकु चांगु , अर्जुना ! ।
निवडूनि , कीजे सेना । लक्षवरी ।।11।।
की , तयाही पाठी । जे वेळी लोह [5] मांसाते घाटी [6] , । 5 तलवार 6 घाव देणे
ते वेळी , विजयश्रियेच्या पाटी [7] । एकुचि बैसे [8] ।।12।। 7 सिंहासन 14 एकच स्थान स्विकारतो
तैसे , आस्थेच्या [9] महापुरी । रिघताती कोटिवरी , । 9 उत्कट इच्छा
परी , प्राप्तीच्या पैलतीरी । विपाइला [10] निगे ।।13।। 10 एखादाच
म्हणौनि ,सामान्य गा नोहे ,। हे सांगता,वडिल गोठी [11] आहे । 11 श्रेष्ठ गोष्ट
परी , ते बोलो येईल ; पाहे । आता प्रस्तुत ऐके ।।14 ।।

**भूमिरापो नलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।**
**अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ।।4।।**

**पृथ्वी,पाणी,अग्नि,वायु,आकाश ही पाच सुक्ष्म भूते, मन, बुद्धि आणि अहंकार मिळून आठ प्रकारे विभागलेली ही माझी प्रकृती आहे.**

तरी अवधारी [12] गा धनंजया ! । हे महदादिक [13] माझी माया । 12 ऐक 13 महत्‌तत्त्वादिक
जैसी , प्रतिबिंबे छाया । निजांगाची ।।15।।
आणि इयेते प्रकृति म्हणिजे । जे अष्टधा भिन्न जाणिजे ।
लोकत्रय निपजे । इयेस्तव ।।16।।
हे अष्टधा भिन्न कैसी ?। ऐसा ध्वनि [14] धरिसी जरी मानसी , । 14 शंका
तरी , तेचि गा ! आता परियेसी । विवंचना [15] ।।17।। 15 विवेचन
आप , तेज , गगन, । मही , मारुत , मन ।
बुद्धि , अहंकारु , हे भिन्न । आठै भाग ।।18।।

**अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।**
**जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ।।5।।**

**ही अपरा म्हणजे खालच्या प्रतीची प्रकृती झाली. हे महाबहो अर्जुना! याशिवाय जिने या जगाचे धारण होते अशी परा म्हणजे श्रेष्ट प्रतीची जीवस्वरुप माझी दुसरी प्रकृती आहे असे समज.**

या आठांची जे साम्यावस्था , । ते माझी परम प्रकृति, पार्था ! ।
तिये नाम व्यवस्था ।' जीवु ' ऐसी ।।19।।
जे जडाते जीववी , । चेतनेते चेतवी ,।
मना करवी , मानवी । शोक मोहो ।। 20 ।।

पै , बुद्धिच्या अंगी जाणणे , । ते जिये जवळिकेचे [1] करणे ।	1 सहवासा मुळे
जिया , अहंकाराचेनि विंदाणे [2] । जगचि धरिजे ।।21।।	2 कौशल्याने

**एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।**
**अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ।।6।।**

**या दोहोपासून सर्व भूते उत्पन्न होतात हे लक्षात असू दे.मीच सर्व जगताचे प्रभव म्हणजे मूळ व प्रलय म्हणजे शेवट आहे.**

ते सुक्ष्म प्रकृति कोडे [3] , । जै स्थुळाचिया आंगा घडे , ।	3 कौतुकाने
तै , भूतसृष्टीची पडे । टांकसाळ ।।22।।
चतुर्विध ठसा । उमटो लागे आपैसा [4] ।	4 आपोआप
मोला तरी सरसा [5] । परी थरचि आनान [6] ।।23।।	5 एकाच योग्यतेचे 6 जाती भिन्न
होती , चौऱ्यांशी लक्ष थरा । येरा [7] मिती [8] नेणिजे , भांडारा ।	7 हा 8 गणती
भरे आदिशून्याचा गाभारा । नाणेयांसी ।।24।।
ऐसे , एकतुके [9] पांचभौतिक । पडती बहुवस टाक [10] ।	9 एका किमतीची 10 नाणी
मग , तिये समृध्दीचे लेख [11] । प्रकृतीचि धरी ।।25।।	11 मोजदाद
जे आखूनि [12] नाणे विस्तारी । पाठी तयाची आटणी [13] करी ।	12 योजना करुन 13 नाश
माजी , कर्माकर्माचिया व्यवहारी । प्रवर्तु [14] दावी ।।26।।	14 मार्ग
हे रुपक , परी असो ; । सांगो उघड , जैसे परियेसो ।
तरी , नामरुपाचा अतिसो [15] । प्रकृतीच कीजे ।।27।।	15 विस्तार
आणि , प्रकृति तंव माझ्या ठायी । बिंबे ; येथे आन [16] नाही ।	16 दुमत
म्हणौनि , आदि मध्य अवसान [17] , पाही । जगासि मी ।।28।।	17 शेवट

**मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ।**
**मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ।।7।**

**माझ्याहून पलीकडचे हे धनंजया ! दुसरे काहीहि नाही. दोऱ्यात अनेक मणि ओवावे त्याप्रमाणे माझ्या ठायी हे सर्व ओवलेले आहे.**

हे रोहिणीचे [18] जळ । तयाचे पाहता ,येइजे ,मूळ ।	18 मृगजळ
ते रश्मि नव्हती; केवळ । होय , ते भानु ।।29 ।।
तयाचिपरी , किरीटी ! । इया प्रकृति ,जालिये [19] सृष्टी ।	19 प्राप्त झालेल्या
जै, उपसंहरून , कीजेल ठी [20] । तै मीचि आहे ।।30।।	20 मुक्काम
ऐसें होय , दिसे न दिसें , । हे मजचि माजी असे ।
मिया विश्व धरिजे ; जैसे । सूत्रे मणि ।।31।।

सुवर्णाचे मणी केले ,। ते सोनियाचे सुती वोविले ।
तैसे , म्या जग धरिले । सबाह्याभ्यंतरी ।।32।।

**रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभाऽस्मि शशिसूर्ययोः ।**
**प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ।।8।।**
**पुण्यो गन्धः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।**
**जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ।।9।।**

**पाण्यामध्ये रस मी, हे कौंतेया ! चंद्र-सूर्यामधली प्रभा मी, सर्व वेदामधला प्रणव म्हणजे ओंकार मी, आकाशात शब्द मी, आणि सर्व पुरुषातले पौरुषहि मी आहे.आणि पृथ्वीच्या ठिकाणी पुष्पगंध म्हणजे सुवास मी व अग्नीमधले तेज मी आहे.सर्व भूतातील जीवनशक्ति व तपस्व्यांमधले तप मी आहे.**

म्हणौनि, उदकी रसु , । कां , पवनी जो स्पर्शु , ।
शशिसूर्यी जो प्रकाशु ।तो मीचि , जाण ।। 33 ।।
तैसाचि , नैसर्गिकु शुद् धु । मी पृथ्वीच्या ठायी गंधु ।
गगनी मी शब्दु । वेदी प्रणवु ।। 34।।
नराच्या ठायी नरत्व ।जे , अहंभाविये [1] सत्व , । — 1 अहंकार
तै पौरुष मी ; हे तत्व । बोलिजत असे ।। 35।।
अग्नि ऐसे आहाच [2]। तेज नामाचे आहे कवच , । — 2 वरवरचे
ते परते [3] केलिया , साच [4] । निजतेज ते मी ।। 36।। — 3 दुर 4 खरा
आणि , नानाविध योनी ।जन्मोनि , भूते , त्रिभुवनी ।
वर्तत आहाति [5] जीवनी । आपुलाल्या ।।37।। — 5 आहेत
एके पवनेचि पिती , । एके तृणास्तव जिती , ।
एके अन्नाधारे राहती , । जळे एके ।।38।।
ऐसे , भूताप्रति आनान , । जे , प्रकृतिवशे दिसे जीवन ।
ते , आघवाठायी अभिन्न । मीचि एक ।। 39।।

**बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।**
**बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजास्विनामहम् ।।10।।**
**बलं बलवतामस्मि कामरागविवर्जितम् ।**
**धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽ स्मि भरतर्षभ ।।11।।**

**हे पार्था ! सर्व भूतांचे सनातन बीज मी असे समज. बुद्धिमानलोकाची बुद्धि मी व तेजस्व्यांचे तेजहि मी आहे. काम वासना आणि राग म्हणजे विषयासक्ति ही दोन्हा वजा करुन बलवानलोकांचे बल मी आहे; आणि हे भरतश्रेष्ठा! धर्माला विरुद्ध न जाणारा असा भूताच्या ठायी कामहि मी आहे**

| | |
|---|---|
| पै [1] , आदिचेनि [2] अवसरे [3] , ।विरुढे [4] गगनाचेनि अंकुरे , । | 1 पण 2 उत्पत्ती 3 वेळ |
| जे , अंती गिळी अक्षरे । प्रणवपीठीची [5] ।।+40।। | 4 रुजणे 5 ॐकार स्थान |
| जव हा विश्वाकारु असे , । तव जे विश्वाचिसारिखे दिसें ,। | |
| मग , महाप्रळयदशे । कैसेही नव्हे ।।41।। | |
| ऐसे अनादि जे सहज ।ते , मी गा ! विश्वबीज । | |
| हे हातातळी तुज । देईजत असें ।।42।। | |
| मग,उघड करुनि,पांडवा ! ।जै,हे आणिसील सांख्याचिया [6] गावा,। | 6सांख्य मार्गाने विचार |
| तै ,ययाचा उपेगु बरवा । देखशील ।।43 ।। | करशील |
| परी , हे अप्रासंगिक आलाप [7] । आता असतु ; न बोलो संक्षेप [8]। | 7 बोलणे 8 थोडक्यात |
| जाण तपियांच्या ठायी तप । ते रुप माझें ।।44।। | |
| बळियामाजी बळ ।ते , मी , जाणे , अढळ । | |
| बुद्धिमंती केवळ । बुद्धि ते, मी ।।45।। | |
| भूतांच्या ठायी कामु , । तो मी , म्हणे , आत्मारामु । | |
| जेणे अर्थास्तव [9] धर्मु । थोरु होय ।।46।। | 9 निमित्ताने |
| एऱ्हवी , विकाराचेनि पैसे [10],। करी कीर इंद्रियाचि ऐसें । | 10 मार्गाने |
| परी , धर्मासि वेखासे [11]। जावो नेदी ।।47।। | 11विरुद्ध |
| जे अप्रवृत्तिचा अव्हांटा [12]। सांडूनि , विधीचिया निघे वाटा । | 12 शास्त्र विरुद्ध |
| तेवीचि , नियमाचा दिवटा [13] । सवे चाले ।। 48।। | कर्म करणे 13 मशाल |
| कामु ऐसिया वोजा प्रवर्ते [14] । म्हणौनि , धर्मासि होय पुरते । | 14 मार्गाने जाण्यास |
| मोक्षतीर्थीचे मुक्ते । संसार भोगी ।। 49।। | उद्युक्त होतो |
| जो , श्रुतिगौरवाच्या मांडवी ,। काम ,सृष्टीचा वेलु वाढवी । | |
| जंव कर्मफळेसि पालवी । अपवर्गी[15] टेके ।।+50।। | 15 मोक्ष |
| ऐसा नियतु [16] का कंदर्पु [17] । जो भूता या बीजरुपु , । | 16 नियमित असणारा |
| तो , मी , म्हणे बापु । योगियांचा ।।51।। | 17 काम |
| हे एकेक किती सांगावे । आतां , वस्तुजातचि आघवे । | |
| मजपासूनि जाणावे । विकारले [18] असें ।।52।। | 18 आकाराला आले |

**ये चैव सात्विका भावा राजसास्तामसाश्च ये ।**
**मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ।।12।।**

**आणि जे काही सात्विक व जे काही राजस किंवा तामस भाव म्हणजे पदार्थ आहेत,ते सर्व माझ्याच पासून असे समज. पण ते माझ्यात आहेत, मी त्यांच्यात नाही.**

जे सात्विक हन भाव । कां , रजतमादि सर्व ।
ते ' ममरुपसंभव ' । वोळखे तूं ।।53।।

हे जाले तरी माझ्या ठायी , । परी तयामाजी मी नाही ।
जैसी , स्वप्नीच्या डोही । जागृती न बुडे ।।54।।
जैसी रसाचीच सुघट [1] , । बीजकणिका घनवट [2] । — 1 उत्तम बनलेली 2 दाट
परी , तियेस्तव होय काष्ट । अंकुरद्वारे ।।55।।
मग , तया काष्टाच्या ठायी । सांग पां ! बीजपण असे काई ? ।
तैसा , मी विकारी [3] नाही , । जरी विकारला दिसें ।। — 3 विकृती
पै , गगनी उपजे आभाळ । परी तेथ गगन नाही ; केवळ ! ।
अथवा , आभाळी होय सलिल । तेथ अभ्र नाही ।।57।।
मग , तया उदकाचेनि आवेशे , । प्रगटले तेज जे लखलखीत दिसे ।
तिये विजुमाजी असे । सलिल कायी ? ।। 58।।
सांगे , अग्नीस्तव धूम होये , । तिये धूमी काय अग्नि आहे ? ।
तैसा , विकारु हा ; ' मी नोहे ' । जरी विकारला असे ।।59।। .

**त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभि : सर्वमिदं जगत् ।**
**मोहितं नाभिजानाति मामेभ्य : परमव्ययम् ।।113।।**

**सत्व रज व तम या तीन गुणात्मक भावानी म्हणजे पदार्थानी मोहित होउन हे सर्व जग, याच्या पलीकडचा अर्थात निर्गुण जो मी अव्यय परमेश्वर त्या मला जाणीत नाही.**

परी उदकी जाली बाबुळी [4] , । ते उदकाते जैसी झाकोळी । — 4 शेवाळ
कां , वायाचि आभाळी । आकाश लोपे ।।60।।
हां गा ! स्वप्न लटिके म्हणो ये,। परि निद्रावशे बाणले [5] होये ,। — 5 घेरले
तंव , आठवु काय देत आहे । आपणपेया ? ।।61।।
हे असो ; डोळ्याचे । डोळाचि पडळ [6] रचे । — 6 पडदा
तेणे देखणेपण डोळ्याचे।न गिळिजे कायी ?।।62।।
तैसी हे माझीच बिंबली । त्रिगुणात्मक साउली।
की, मजचि आड वोडवली [7] । जवनिका [8] जैसी ।।63।। — 7 पुढे केला 8 पडदा
म्हणौनि , भूते माते नेणती । माझीच , परी मी नव्हती ।
जैसी , जळीची जळी न विरती । मुक्ताफळे ।।64।।
पै , पृथ्वीयेचा घटु कीजें । सवेचि पृथ्वीसि मिळे , तरी मेळविजें ।
एऱ्हवी , तोचि अग्निसंगे सिजें , । तरी वेगळा होय ।।65।।
तैसे , भूतजात सर्व , । हे माझेचि कीर अवयव ।
परि , मायायोगे जीव-। दशे आले ।।66।।
म्हणौनि , माझेचि ,मी नव्हती । माझेचि , मज नोळखती ।
अहंममताभ्रांती [9] । विषयांध जाले ।।67।। — 9 अहंकार,भ्रम,ममता व विषयलालसा यामुळे

**दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।**
**मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ।।14।।**

**गुणात्मक अशी ही माझी दिव्य माया दुस्तर आहे. म्हणून जे मलाच शरण येतात ते या मायेला तरून जातात.**

आतां , महदादि हे माझी माया । उतरोनिया ; धनंजया ! ।
' मी होइजे ' हे आया [1] । कैसेनि ये ! ।।68 ।। — 1 साध्य
जिये ब्रह्मचळाचा आधाडा [2] । पहिलिया [3]संकल्पजळाचा उभडा [4] । — 2 अर्धा तुटलेला कडा
सवेचि महा भूतांचा बुडबुडा । साना आला ।।+69।। — 3 सुरवातीलाच 4 उसळी
जे सृष्टिविस्ताराचेनि वोघे । चढत काळकळनेचेनि वेगे [5] । — 5 कालगतीच्या वेगाने
प्रवृत्तिनिवृत्तीची तुंगे [6] । तटे सांडी ।।+70।। — 6 शीखर
जे गुणघनाचेनि [7] वृष्टिभरे । भरली मोहाचेनि महापुरे । — 7 सत्वगुणरुपी मेघ
घेऊनि जात नगरे । यमनियमांची ।।+71।।
जे द्वेषाच्या आवर्ती [8] दाटत ।मत्सराचे वळसे पडत । — 8 भोवरे
माजी प्रमादादि तळपत ।महामीन ।।+72।।
जेथ प्रपंचाची वळणे ।कर्माकर्माची बोभाणे [9] । — 9 पूर
वरी तरताती वोसाणे [10] । सुखदुःखाची ।।+73।। — 10 पुराड
रतीचिया बेटा ।आदळती कामाचिया लाटा ।
जेथ जीवफेन संघटा [11] । सैंध दिसें ।।+74।। — 11 जीवरूपी फेसाचे पुंजके 12 धारा
अहंकाराचिया चळिया [12] । वरि मदत्रयाचिया उकळिया ।
जेथ विषयोर्मीच्या आकळिया [13] । उल्लाळ [14] घेती ।।+75।। — 13 प्रसार 14 उसळी
उदयास्ताचे लोंढे ।पाडीत जन्ममरणाचे चोंढे [15] । — 15 खळगे
जेथ पांचभौतिक बुडबुडे । होती जाती ।।+ 76।।
सम्मोह विभ्रम मासे । गिळिताती धैर्याची आविसे [16] । — 16 आमीष
तेथ देव्हडे [17] भोवत वळसे । अज्ञानाचे ।।+77।। — 17 वक्र
भ्रांतीचेनि खडुळे [18] । रेवले [19] आस्थेचे अवगाळे [20] । — 18 गढुळपणा 19 रुतले
रजोगुणाचेनि खळाळे । स्वर्गु गाजे ।।+78।। — 20 गाळ
तमाचे धारसे वाड [21] । सत्वाचे स्थिरपण जाड [22] । — 21मोठा प्रवाह 22 गंभीर
किंबहुना , हे दुवाड [23] । मायानदी ।।+79।। — 23 कठीण
पै , पुनरावृत्तीचेनि उभडे [24] ।झळंबती [25] सत्यलोकीचे हुडे [26] । — 24 लाटा 25 आदळतात
धाये, गडबडती धोंडे । ब्रह्मगोळकाचे ।।+80।। — 26 बुरुज
तया पाणियाचेनि वहिलेपणे,।अझुनी न धरिती, वोभाणे [27] । — 27 पूर
ऐसा मायापूर हा ! कवणे । तरिजेल गा ? ।।+81।।

येथ एक नवलावो , । जो , जो कीजे तरणोपावो , ।
तो , तो अपावो ।होय ; ते ऐक ।।+82।।
एक , स्वयंबुद्धीच्या बाही । रिगाले ; तयांची शुद्धीचि नाही ।
एक , जाणिवेचे डोही । गर्वेचि गिळिले ।।+83।।
एकी,वेद त्रयाचिया सांगडी [1] । घेतल्या अहंभावाचिया धोंडी ।
ते मदमीनाच्या तोंडी ।सगळेचि गेले ।।+84 ।।
एकी,वयसेचे जाड [2] बांधले । मग मन्मथाचिये कांसे लागले ।
ते विषयमगरी सांडिले । चघळुनिया ।।+85।।
आतां , वार्धक्याच्या तरंगा- । माजी मतिभ्रंशाचा जरंगा [3] ।
तेणे कवळिजताती , पै , गा ! । चहुकडे ।।+86।।
आणि शोकाचा कडा उपडत [4] । क्रोधाच्या आवर्ती दाटत ।
आपदागिधी चुंबिजत [5] । उधवला [6] ठायी ।।+87।।
मग दुःखाचेनि बरबटे बोंबले [7] । पाठी मरणाचिये रेवे [8] रेवले [9] ।
ऐसे कामाचे कांसे [10] लागले । ते गेले वायां ।।+88।।
एकी , यजनक्रियेची पेटी ।बांधोनि घातली पोटी , ।
ते , स्वर्गसुखाच्या कपाटी । शिरकोनि ठेले ।।89।।
एकी,मोक्षी लागावयाचिया आशा,। केला कर्मबाह्यांचा भरवसा,।
परी ते पडिले वळसा [11] , । विधिनिषेधांच्या ।।90।।
जेथ वैराग्याची नाव न रिगे , । विवेकाचा तागा न लगे , ।
वरि काही तरो , ये ' योगे ' । तरी विपाय[12] तो ।।91।।
ऐसें , तरी ' जीवाचिये आंगवणे [13] , । इये मायानदीचे तरणे ' ।
हे कासयासारिखे बोलणे । म्हणावे पां ? ।।92।।
जरी अपथ्यशीळा व्याधी , ।कळे , साधूसी दुर्जनाची बुद्धी ।
कीं , रागी [14] सांडी रिद्धी ।आली सांती ।।93।।
जरी चोरां सभा [15] दाटे [16] । अथवा मीना गळु घोटे ।
ना तरी भेडा [17] उलटे । विवसी जरी ।।94।।
पाडस वागुर करांडी [18] । कां मुंगी मेरु वोलांडी ।
तरी मायेची पैलथडी । देखती जीव ।।95।।
म्हणौनि गा पंडुसुता ! ।जैसी सकामा न जिणवेचि वनिता , ।
तेवी , मायामय ही सरिता । न तरवे जीवां ।।96।।
येथ एकचि लीला तरले । जे सर्वभावे मज भजले ।
तयां , ऐलीच थडी सरले । मायाजळ ।।97।।
जया सद्‌गुरुतारु फुडे । जे अनुभवाचे कांसे [19] गाढे ।
जया आत्मनिवेदनतरांडे [20] ।आकळले ।।98।।

1 भोपळ्याचा तराव
2 तारूंण्याच्या बळाने कंबर कसली
3 जाळे
4 आपटत 5 आपत्तीरुपी गीधाडे 6 वर करणे
7 चीखलाने बरबटले 8 गाळ
9 रुतलेले 10 मागे
11 वळण
12 क्वचितच
13 जीवाला शक्य आहे
14 लोभी
15 सभेत 16 शिरण्याची हिम्मत होईल 17 भित्रा
18 जाळे कुरतडणे
19 आधार
20 आत्मबोधाचा तराफा

जे अहंभावाचे वोझे सांडुनी । विकल्पाचिया झुळका चुकाउनी ।
अनुरागाचा [1] ,निरुता होऊनि [2] ,। पाणिढाळु [3] ।।99।।
जया ऐक्याचिया उतारा ।बोधाचा जोडला तारा ।
मग निवृत्तीचिया पैल तीरा । झेपावले जे ।। 100।।
ते उपरतीच्या वांवी [4] सेलत [5] । सोऽहंभावाचेनि थावे [6] पेलत ।
मग निघाले अनकळित [7] । निवृत्तितटी ।।101।।
येणे उपाये मज भजले । ते, हे माझी माया तरले ।
परि ऐसे भक्त विपाइले ! । बहुवस नाही ! ।।102।।

1 विषयासक्तीरुपी पाण्याचा
2 नीट तपासून 3 ओघ
4 हात 5 पाणी तोडत 6 अहं ब्रह्मास्मि या धीऱाने 7 प्रयास न पडता
7 प्रयास न पडता

**न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः ।**
**माययाऽपहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ।।15।।**
**चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।**
**आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ।।16।।**

**मायेनी ज्यांचे ज्ञान नष्ट केले, ते मूढ व दुष्कर्मी नराधम आसुरी बुद्धीत पडून मला शरण येत नाहीत. हे भरतश्रेष्ठा अर्जुना ! चार प्रकारचे पुण्यवान लोक माझी भक्ती करीत असतात. आर्त म्हणजे रोगाने पीडलेले, जिज्ञासु म्हणजे ज्ञान प्राप्त करून घेण्याची इच्छा बाळगणारे, अर्थार्थी म्हणजे द्रव्यादिक काम्य-वासना ठेवणारे, आणि ज्ञानी म्हणजे परमेश्वराचे ज्ञान होऊन कृतार्थ झाल्यामुळे पुढे कांहीं मिळवावयाचे नसले तरी निष्काम बुद्धीने भक्ती करणारे.**

जें , बहुतां एकां अव्हांतरु [8] । अहंकाराचा भूतसंचारु ।
जाहला ,म्हणौनि विसरु । आत्मबोधाचा ।।103।।
ते वेळी,नियमाचे वस्त्र नाठवे,। पुढील अधोगतीची [9] लाज नेणवे ।
आणि करितातिं ’ जे न करावे ’ । वेदु म्हणे ।।104।।
पाहे , पां ! शरीराचिया गांवा । जयालागी आले , पांडवा ! ।
तो कार्यार्थु आघवा । सांडूनिया ।।105।।
इंद्रियग्रामीचे राजबिंदी [10] । अहंममतेचिया जल्पवादी [11] ।
विकारांतरांची मांदी । मेळवूनियां ।।106।।
दुःखशोकांच्या घाई [12] , । मारिलियाची सेचि नाही ।
हे सांगावया कारण काई ? ।जें , ग्रासिले माया ! ।।107।।
म्हणौनि , ते माते चुकले ।ऐका ! चतुर्विध मज भजले ।
जिही आत्महित केले । वाढते गा ! ।।108 ।।
तो पहिला आर्तु [13] म्हणिजे , । दुसरा जिज्ञासु बोलिजें , ।
तिजा अर्थार्थी जाणिजे । ज्ञानिया चौथा ।।109।।

8 इतर
9 निकृष्ट जन्म
10 राजमार्ग 11 मी व माझे अशा समजुतीने केलेली बडबड
12 घाव
13 रोगाने त्रासलेला

**तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।**
**प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ।।17।।**
**यापैकी एकभक्ति म्हणजे अनन्यभावे माझी भक्ति करणारा व नेहमीच युक्त म्हणजे निष्काम-बुद्धीने वागणारा,असा जो ज्ञानी त्याची योग्यता विशेष होय ! ज्ञान्याला मी अत्यंत प्रिय , व ज्ञानी मला अत्यंत प्रिय आहे.**

तेथ , आर्तु तो आर्तीचेनि व्याजे , ।जिज्ञासु , तो जाणावयालागी भजे ।
तिजेनि , तेणे इच्छिजे । अर्थसिध्दि ।।110।।
मग , चौथियाच्या ठायी , । काहीचि करणे नाही ।
म्हणौनि , भक्तु एकु पाही । ज्ञानिया जो ।।111।।
जे , तया ज्ञानाचेनि प्रकाशे । फिटले भेदाभेदाचे कडवसे , ।
मग , मीचि जाहला , समरसे । आणि भक्तुही तेवीचि ।।112।।
परि , आणिकाचिये दिठी , नावेक । जैसा , स्फटिकुचि आभासे उदक ,।
तैसा ज्ञानी नव्हे ; कौतुक ।सांगतां तो ।।+113।।
जैसा , वारा कां गगनी विरे , । मग वारेपण वेगळे नुरे ।
तेवी ' भक्त ' हे पैज न सरे , । जरी ऐक्या आला ।।+114।।
जरी पवनु हालवूनि पाहिजे , । तरी गगनावेगळा देखिजे ।
एऱ्हवी , गगन तो सहजें । असे जैसे ।।115।।
तैसे , शरीरी , हन , कर्मे ।तो ' भक्तु ' ऐसा गमे ,।
परी , अंतरप्रतीतिधर्मे [1] । मीचि जाहला ।।116।। — 1 मानसीक स्वभाविक
आणि ज्ञानाचेनि उजिडलेपणे । ' मी आत्मा ' ऐसे तो जाणे । — अनुभवाने
म्हणौनि , मीही तैसेचि म्हणे । उचंबळला सांता[2] ।।117।। — 2 आनंदाने
हां गा ! जीवापैलीकडिलीये खुणे [3] ,। जो , पावोनि वावरो [4] जाणे । — 3 मर्म 4 वागणे
तो देहाचेनि वेगळेपणे । काय वेगळा होय ? ।।118 ।।

**उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।**
**आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ।।18।।**
**सर्वच हे भक्त उदार म्हणजे चांगले होत; पण त्यातल्या त्यात ज्ञानी म्हणजे मीच असे माझे मत आहे. कारण युक्तचित्त होत्हाता सर्वांची उत्तोमत्तम गति जो मी त्या माझ्या ठायी तो स्थिरावलेला असतो.**

म्हणौनि,आपुल्याला हिताचेनि लोभे,। मज,आवडे[5] तोहि भक्त झोंबे । — 5 कोणताही
परी , मीचि करी वालभे [6] । ऐसा ज्ञानिया एकु ।।119।। — 6 प्रेम
पाहे, पां ! दुभतयाचिया आशा । जगचि धेनूसि करीतसे फांसा [7]। — 7 पाय बांधतात
परि दोरेवीण कैसा । वत्साचा बळी [8] ! ।।120।। — 8 वासराचे प्रेमाचा बळकटपणा

कां , जे तनुमनुप्राणे । ते आणिक काहीचि नेणे ।
देखे तयाते म्हणे ।' हे माय माझी ' ।।121।।
ते येणे माने अनन्यगती ।म्हणौनि ,धेनुही तैसीचि प्रीति ।
यालागी , लाक्ष्मीपती।बोलिले साचे ।।122।।
हे असो ; मग म्हणितले । जे कां तुज सांगितले , ।
तेही भक्त भले ! । पढियंते आम्हा ।।123।।
परि जाणोनिया माते , । जे पाहो विसरले मागौते ,।
जैसे , सागरा येऊनि सरिते । मुरडावे ठेले ।।124।।
तैसी अंतःकरणकुहरी जन्मली , । जयाची प्रतीतिगंगा मज मिनली ।
' तो मी ' हे काय बोली । फार करु ?।125।।
एऱ्हवी ज्ञानिया जो म्हणिजे , । तो चैतन्यचि केवळ माझे ।
हे न म्हणावे , परि काय कीजे ? । न बोलणे बोलो ! ।।126।।

**बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।**
**वासुदेवः सर्वमिति स माहात्मा सुदुर्लभः ।।19।।**
**अनेक जन्मानंतर ' जे काही आहे ते वासुदेव आहे ' असे अनुभवास येऊन ज्ञानवान मला येऊन पोचत असतो. असा महात्मा अत्यंत दुर्मिळ आहे**

जे , तो विषयांची दाट झाडी-। माजी , कामक्रोधांची साकडी ।
चुकावूनि , आला पाडी [1] । सद्वासनेचिया ।।127।।
मग , साधुसंगे, सुभटा ! । उजू सत्कर्माचिया वाटा ।
अप्रवृत्तीचा अव्हाटा । डावलूनि ।।128।।
आणि जन्मशतांचा वाहतवणा [2] ,।तेविची,आशेचिया न लेचि वाहणा [3] ।
तेथ फलहेतूचा उगाणा [4] ।कवणु चाळी ?।।129।।
ऐसा शरीरसंयोगाचिये राती-। माजी , धावता सडिया आयती [5] ।
तव कर्मक्षयाची पाहाती [6]। पहाट जाली ।।130।।
तैसीच गुरुकृपा उखा [7] उजळली । ज्ञानाची वोतपली [8] पडली ।
तेथ साम्याची ॠध्दि उघडली । तयाचिये दिठी ।।131।।
ते वेळी जयाकडे वास पाहे , । तेउता मीचि तया एकु आहे ।
अथवा निवांत जरी राहे , । तऱ्ही मीचि तया ।। 132।।
हे असो ; आणिक कांहीं ?। तया सर्वत्र मीवाचूनि नाही ।
जैसे , सबाह्य जळ , डोही । बुडालिया घटा ।।133।।
तैसा , तो मजभीतरी , । मी तया आतुबाहेरी ।
हे सांगिजेल बोलवरी [9] , । तैसे नव्हे ।।134।।

1 डोंगरावर
2 रानातून चालणारा
3 पादत्राण 4 हिशेब
5 तयारी
6 उजाडता
7 उषःकाल
8 कोवळे उन
9 न बोलण्यासारखे

म्हणौनि असो हें ; इयापरी । तो देखे ज्ञानाची वाखारी [1] । 1 वखार
तेणे संसरलेनि [2] करी , । आपु विश्व ।।135।। 2 त्या ज्ञानाने
हे समस्तही श्रीवासुदेवो । ऐसा , प्रतीतिरसाचा वोतला भावो । व्यवहार करून
म्हणौनि , भक्तामाजी रावो । आणि ज्ञानिया तोचि ।।136।।
जयाचिये प्रतीतीचा वाखारा [3]। पवाडु [4] होय चराचरा । 3 वखार 4 सर्व दृष्यजात
तो महात्मा , धनुर्धरा ! । दुर्लभु आथी ।।137।। सामावण्या इतकी मोठी प्रज्ञा
येर , बहुत जोडती , किरीटी ! । जयांची भजने , भोगासाठी ।
जे , आशातिमिरे दृष्टी , । विषयांध जाले ।।138।।

**कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवता ः ।**
**तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ।।20।।**
**आपआपल्या प्रकृतिनियमाप्रमाणे त्या त्या स्वर्गादिक फलांच्या कामवासनांनी वेडावलेले लोक तो तो उपासनेचा नियम पाळून दुसऱ्या निरनिराळ्या देवतांच्या भजनी लागत असतात.**

आणि फळाचिया हांवा , । हृदयी कामा जाला रिगावा ।
की , तयाचिये घसणी [5] दिवा । ज्ञानाचा गेला ।।139।। 5 संसर्गाने
ऐसे उभयतां आंधारी पडले , । म्हणौनि , पासीचि माते चुकले ।
मग , सर्वभावे अनुसरले । देवतांतरां ।।140।।
आधीच प्रकृतीचे पाइक , । वरी भोगालागी , तंव रंक [6] । 6 दीन झाले असतात
मग , तेणे लोलुपत्वे [7], कौतुक [8] , । कैसेनि भजती ! । 141।। 7 लंपटपणाने 8 कौतुकाने
कवणी तिया नियमबुध्दि ! ।कैसिया हन उपचारसमृध्दि ! ।
कां , अर्पण यथाविधि । विहित करणे ।।142।।

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलां श्रद्धा तामेव विदधाम्यहम् ।।21।।**
**जो जो भक्त ज्या ज्या रुपाची म्हणजे देवतेची श्रद्धेने उपासना करु इच्छितो त्याची त्याची तीच श्रद्धा मी स्थिर करितो .**

पै , जो जिये देवतांतरी । भजावयाची चाड करी , ।
तयाची ते चाड , पुरी । पुरविता मी ।।143 ।।
देवोदेवी मीचि ,पाही ! । हाही निश्चयो त्यासि नाही ।
भावो , ते , ते ठायी , । वेगळा धरिती ।।144 ।।

**स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।**
**लभते च ततः कामान् मयैव विहितान् हि तान्   ।।22।।**

**मग त्या श्रद्धेने युक्त होत्साता, तो त्या देवतेचे राधन म्हणजे आराधना करु लागतो; आणि मग मीच निर्मिलेली ती कामफले त्याला मिळतात.**

मग तिया श्रद्धायुक्त , । तेथिचे आराधन जे उचित ।
ते , सिद्धीवरी समस्त ।वर्तो लागे ।।145 ।।
ऐसे जेणे जे भाविजे , । ते फळ तेणे पाविजे ।
परी , तेही सकळ निपजे । मजचिस्तव ।।146।।

**अन्तवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ।**
**देवान्देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि ।।23।।**

**पण या अल्पबुद्धी लोकांना मिळणारे हे फल नाशवंत असते,मोक्षासारखे कायम टिकणारे नव्हे, देवांचे भजन करणारे देवांकडे जातात, आणि माझे भक्त मजकडे येतात.**

परी ते भक्त माते नेणती , । जे , कल्पनेबाहेरी न निघती ।
म्हणौनि , कल्पित फळ पावती । अंतवंत [1] ।।147।।    1 नाशवंत
किंबहुना ? ऐसे जे भजन , । ते , संसाराचेचि साधन ।
येर , फळभोग तो स्वप्न ! । नावभरी [2] दिसे ! ।।148।।    2 क्षणभर
हे असो परौते ; । मग हो का आवडे ते ।
परी , यजी जो देवतांते , । तो देवत्वासीचि ये ।।149।।
येर तनुमनुप्राणी । जे अनुसरले माझेयाचि वाहणी ।
ते देहाच्या निर्वाणी । मीचि होती ।।150।।

**अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यते मामबुद्धयः ।**
**परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ।।24।।**

**अबुद्धि  म्हणजे मुढ लोक, माझे पर म्हणजे श्रेष्ठ , उत्तमोत्तम आणि अव्यय रुप न जाणिता अव्यक्त अशा मला व्यक्त झालेला मानितात.**

परी तैसे न करिती प्राणिये , ।वायां , आपुलिया हिती वाणिये [3] ।    3 तोट्याने
जे , पोहताती पाणिये। तळहातीचेनि ! ।।151।।
नाना , अमृताच्या सागरी बुडिजे , । मग , तोंडा कां वज्रमिठी पाडिजे ?।
आणि मनी तरी आठविजे । थिल्लरोदकाते ! ।।152।।

हे ऐसे कासया करावे ?। जे अमृतीही रिगोनि मरावे ? ।
ते सुखे अमृत होऊनि कां नसावे ?। अमृतामाजी ? ।153।। 1 सापळा
तैसा , फळहेतूचा पांजरा [1]। सांडूनियां ; धनुर्धरा ! । 2 अनुभवरुपी पंखांनी
कां प्रतीतिपाखी[2] चिदंबरा[3] । गोसाविया[4] नोहावे?।।154।। 3 चैतन्यस्वरुपी आकाशाचे
जेथ उंचावलेनि पवाडे [5] , । सुखाचा पैसारु [6] जोडे । 4 स्वामी 5 सामर्थ्याने
आपुलेनि सुरवाडे [7] । उडो ये , ऐसा ।।155 ।। 6 अमर्याद सुखाचा विस्तार
तया उमपा माप कां सुवावे [8] ? । मज अव्यक्ता व्यक्त का मानावे ? । 7 सुखाने 8 घालावे
सिद्ध असतां[9] , कां निमावे[10] । साधनवरी[11] ? ।156।। 9 मुक्त असून देखील
परी , हा बोल आघवा , । जरी विचारीजतसे , पांडवा ! । 10 अडकावे 11 साधनांनी
तरी विशेषे , या जीवां । न चोजवे [12] गा ! ।।157।। 12 समजत नाही

**नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ।**
**मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ।।25।।**
**मी आपल्या योगरुप मायेने आच्छादित असल्यामुळे सर्वांना स्वस्वरुपाने प्रकट दिसत नाही.**
**मी अज व अव्यय आहे हे मूढ लोक जाणीत नाहीत.**

कां , जे , योगमायापडळे [13], । हे , जाले आहाति आंधळे ,। 13 प्रकृतीच्या मायारुपी
म्हणौनि , प्रकाशाचेनि देहबळे । न देखती माते ।।158।। झापडेने
एऱ्हवी , मी नसे ऐसें । काय वस्तुजात असे ? ।
पाहें पां ! कवण जळ , रसे-।रहित आहे ? ।।159।।
पवनु कवणाते न शिवेचि ? । आकाश के न समायेचि ? ।
हे असो ; एकु मीचि ।विश्वी आहे ।।160।।

**वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ।**
**भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ।।26।।**
**भूत, वर्तमान व भविष्य काळी झालेली, असणारी व होणारी सर्व भूते म्हणजे प्र्राणी मी जाणितो;**
**पण हे अर्जूना ! मला कोणीहि जाणीत नाही.**

येथे भूते जिये अतीतली [14] , । तिये मीचि होऊनि ठेली । 14 होऊन गेली
आणि वर्तत आहाति जेतुली , । तीही मीचि ।।161।।
कां , भविष्यमाणे जिये[15] ही , । तीही मजवेगळी नाही । 15 भविष्यात होणारी
हा बोलचि ; एऱ्हवी कांहीं । होय , ना जाय ।।162।।

दोराचिया सापासी । डोंबा बडिया ना गव्हाळा [1] ऐसी । 1 काळा कवड्याचा की गव्हाळ
संख्या न करवे कोण्हासी,। तेवी,भूतासि,मिथ्यत्वे ।।163।।
मी ऐसा ; पंडुसुता ! । अनुस्युतु [2] सदा असता , । 2 अखंड
या संसार ,जो भूतां , ।तो, आने बोले [3]।।164।। 3 वेगळीच गोष्ट आहे
तरी , तेचि [4]आता थोडीसी । गोठी सांगिजेल ; परियेसी । 4 त्या संसाराची
जै , अहंकारा तनूसी , । वालभ [5] पडिले ।। 165।। 5 प्रेम

**इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत ।**
**सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप ।।27 ।।**

**कारण हे भारता ! इंद्रियांच्या इच्छा व द्वेष यापासून उद्भवणाऱ्या सुखदुःखादि द्वद्वाच्या मोहाने सर्व भूते हे परंतपा ! या सृष्टीत भ्रम पावत असतात.**

तेथ इच्छा हे कुमारी जाली । मग , ते कामाचिया तारुण्या आली ।
तेथ द्वेषेसी मांडली । वऱ्हाडिक ।।166।।
तया दोघांस्तव जन्मला ।ऐसा द्वंद्वमोहो [6] जाला । 6 सुखदुःख,हर्षशोक, हानी लाभ असा अज्ञानभाव
मग तो ,आजेयाने [7] , वाढविला । अहंकारे ।।167।। 7 अहंकाररुपी आजोबाने
जो , धृतीसी सदा प्रतिकुळु । नियमाही नागवे [8] ,सळु [9] । 8 आवरत नाही 9 छळतो
आशारसे दोंदिलु ।जाला सांता ।।168।।
असंतुष्टीचिया [10] मदिरा । मत्त होऊनि , धनुर्धरा ! । 10 असमाधान
विषयांचे वोवरा [11] । विकृतीशी असे ।।169।। 11 खोलीत
तेणे भावशुद्धीचिये वाटे , । विखुरले विकल्पाचे कांटे ।
मग चिरिले आव्हाटे । अप्रवृत्तिचे ।।170।।
तेणे भूते भांबावली ।म्हणौनि संसाराचिया आडवामाजी [12] पडिली ।
मग महादुःखाच्या घेतली । दांडे वरी [13] ।।171।। 12 अरण्यात 13 दांडक्याने

**येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।**
**ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः ।। 28।।**

**पण ज्या पुण्यकर्मी लोकांचे पाप संपले ते सुखदुःखादि द्वंद्वाच्या मोहातुन सुटून दृढव्रत होत्साते माझी भक्ती करितात.**

ऐसे, विकल्पाचे वायाणे । काटे[14],देखोनि सणाणे [15] । 14 संशयरूपी खोटे काटे
जे मतिभ्रमाचे [16] पासवणे [17] । घेतीचिना ।। 172।। 15 तीक्ष्ण 16 द्वंद्व मोहाच्या
उजु एकनिष्ठेच्या ,पाउली । रगडूनि विकल्पाचिया, भाली [18] । 17 माघार घेत नाही
महापातकाची सांडिली । अटवी [19] जिही ।।173।। 18निष्टारुपी भाल्याने
19 अरण्य

मग पुण्याचे धावा घेतलें । आणि माझी जवळीक पातले ।
किंबहुना , चुकले । वाटवधेयां ।। 174 ।।

**जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये ।**
**ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम।।29।।**

**जे याप्रमाणे माझा आश्रय करून जरामरणातून म्हणजे पुनर्जन्माच्या फेऱ्यातून सुटका होण्यासाठी प्रयत्न करितात ते सर्व ब्रह्म, सर्व अध्यात्म आणि सर्व कर्म म्हणजे काय ते जाणितात.**

एऱ्हवी तरी पार्था ! । जन्ममराणाची निमे [1] कथा ।
ऐसिया प्रयत्नाते , आस्था । विये जयांची , ।। 175।।
तयां , तो प्रयत्नुचि एके वेळे , । मग समग्र परब्रह्मे फळे ।
जया पिकलेया , रसु गळे । पूर्णतेचा ।।176।।
ते वेळी कृतकृत्यता जग भरे । तेथ अध्यात्माचे नवलपण पुरे ।
कर्माचे काम सरे । विरमे मन ।।177।।
ऐसा , अध्यात्मलाभु तया ।होय ,गा धनंजया !।
भांडवल , जया , । उद्यमी मी ।।178।।
तयाते , साम्याचिये वाढी , ।ऐक्याची सांदे [2] कुळवाडी ।
तेथ भेदाचिया दुबळवाडी [3] । नेणिजे तया ।। 179 ।।

1 नाहीशी होणे
2 जोडणे
3 दारिद्र्य

**साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदु ः ।**
**प्रयाणकालेऽ पि च मां ते विदुर्युक्तचेतस ः ।। 30 ।।**

**आणि अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ यांच्यासह म्हणजे हे सर्व मीच आहे अशा प्रकारे मला जे जाणितात ते युक्तचित्त असल्यामुळे मरणसमयी देखील मला जाणितात.**

जिही साधिभूता [4] माते । प्रतीतीचेनि हाते ।
धरूनि ; अधिदैवाते [5] ।शिवतले गा ।।180।।
जया जाणिवेचेनि वेगे , ।मी अधियज्ञुही [6] दृष्टी रिगे।
ते , तनुचेनि वियोगे ।विऱ्हये[7] नव्हती ।। 181।।
एऱ्हवी,आयुष्याचे सूत्र विघडता,। भूतांची उमटे खडाडता [8] ।
काय न मरतयाचियाहि [9] चिता ।युगांतु नोहे ?।।182।।
परी नेणो कैसे , पै , गा ! । जे जडोनि गेले माझिया आंगा ,।
ते ,प्रयाणीचिया लगबगा । न सांडितीच माते ।।183।।
एऱ्हवी तरी जाण , । ऐसे जे निपुण , ।
तेचि , अंतःकरण-। युक्त योगी ।।184।।

4 पंचभूताश्रयी विनाशी वस्तु सह 5 जीव
6 शरीरात शरीर भावाचे उपशमनकरणारा 7 दुःखी
8 खळबळ
9 जीवंत माणसालाहि मृत्य दर्शनाने

तंव इये शब्दकुपिकेतळी [1] , । नोडवेचि [2] अवधानाची अंजुळी । 1 शब्दरुपी शीशाचा तळ
जे ,नावेक ,अर्जुन तये वेळी , । मागांचि होता ।।185।। 2 पुढे आली नाही
जेथ तद्ब्रह्मवाक्यफळे [3] । जिये नानार्थरसे रसाळे । 3 त्या ब्रह्मरुप वाक्यांचा अर्थ
बहकताती [4] परिमळे । भावाचेनि ।।186।। 4 दरवळणे
सहज कृपामंदानिळे । कृष्णद्रुमाची वचनफळे ।
अर्जुन श्रवणाचिये खोळे । अवचित पडिली ।।187।।
तिये प्रमेयाची हो, का, वळली । की ब्रह्मरसाच्या सागरी चुबुकळिली ।
मग तैसीचि का घोळिली ।परमानंदे ।।188।।
तेणे बरवेपणे निर्मळे , । अर्जुना उन्मेषाचे डोहळे ।
घेताति गळाळे [5] । विस्मयामृताचे ।।189।। 5 घोट
तिया सुखसंपत्ती जोडलिया । मग स्वर्गा वाती वाकुलिया [6] । 6 वेडावून दाखवणे
हृदयाच्या जीवी गुतकुलिया [7] ।होत आहाती ।।190।। 7 गुदगुल्या
ऐसे , वरचिलीचि बरवा । सुख जावो लागले फावा [8] । 8 उतु जाऊ लागले
तंव , रसस्वादाचिया हांवा । लाहो[9] केला ।। 191।। 9 उत्कट इच्छा झाली
झडकरी , अनुमानाचेनि करतळे , । घेऊनि तिये वाक्य फळे ।
प्रतीतिमुखी [10] , एक वेळे । घालू पाहे ।। 192।। 10 अनुभवरुपी मुखात
तंव,विचाराचिया रसना न दाटती ।परी,हेतूच्या दशनी न फुटती ।
ऐसे जाणौनि , सुभद्रापती । चुंबिचिना ! ।। 193।।
मग , चमत्कारला , म्हणे ।' इये जळीची मा तारांगणे , ।
कैसा झकविलो असलगपणे [11] । अक्षरांचेनि ।। 194।। 11 सहज फसवला गेलो
इये पदे नव्हती फुडिया [12] । गगनाचिया घडिया ! । 12 खरोखर
येथ , आमुची मति बुडालिया , । थावो न निघे ।।195।।
वाचूनि , जाणावयाची के गोठी ?। ऐसे जीवी कल्पुनि , किरीटी ! ।
तिया पुनरपि केली दृष्टी । यादवेंद्रा ।।196।।
मग विनविले सुभटे । हां हो , जी ये एकवाटे [13] । 13 एकत्र आलेली
सातही पदे अनुच्छिष्टे [14] । नवले [15] आहाती ।।197।। 14 न सेवन केलेले
एऱ्हवी , अवधानाचेनि वहिलेपण [16] । नाना प्रमेयांचे उगाणे । 15 अपूर्व 16 वाहण्याचा वेग
काय श्रवणाचेनि आंगवणे [17] । बोलो लाहाती ? ।। 198।। 17 बलाने
परी , तैसे हे नोहेचि देवा ! ।देखिला अक्षरांचा मेळावा , ।
आणि , विस्मयाचिया जीवा । विस्मयो जाला ।।199।।
कानाचेनि गवाक्षद्वारे । बोलाचे रश्मी अभ्यंतरे ।
पाहेना , तंव चमत्कारे । अवधान ठकले ।।200।।

तेवीचि , अर्थाची चाड मज आहे ।ते सांगताही वेळू न साहे ।
म्हणौनि ,निरूपण लवलाहे [1] । कीजो देवा ! ।।201।। 1 लवकर
ऐसा , मागील पडताळा घेउनी । पुढा अभिप्राय दृष्टी सूनी ।
तेवीचि माजी शिरउनी । आर्ती आपुली । 202।।
कैसी पुसती पाहे पां ! जाणिव । भिडेचि , तरी लंघो नेदी शिव ।
एऱ्हवी , श्रीकृष्ण हृदयासि खेव [2] । देवो सरला [3] ।। 203।। 2 गळामिठी 3 दिली असती
अहो ! श्रीगुरुते जै पुसावे , । तै , येणे माने सावध होआवे ।
हें , एकचि जाणे , आघवे । सव्यसाची ।। 204।।
आता तयाचे ते प्रश्न करणें , । वरी सर्वज्ञ श्रीहरीचे बोलणे ।
संजयो आवडलेपणे । सांगैल कैसे ! ।। 205।।
तिये अवधान द्यावे गोठी । बोलिजेल नीट मऱ्हाटी ।
जैसी कानाचे आधी , दिठी । उपेगा जाये ।। 206।।
बुद्धीचिया जिभा । बोलाचा न चाखता गाभा ।
अक्षरांचिया भांबा [4]। इंद्रिये जिती ।। 207।। 4 शोभा
पहा पां ! मालतीचे कळे , । घ्राणासि कीर वाटले परिमळे ।
परि , वरचिला बरवा , काई डोळे । सुखिया नव्हती ? ।। 208 ।।
तैसे देशियेचिया हवावा [5] । इंद्रिये करिती राणिवा [6] । 5 शोभा 6 तरतरीत होतात
मग प्रमेयाचिया गांवा । लेसा [7] जाइजे ।। 209।। 7 तयारीने
ऐसेनि नागरपणे । बोलु निमे ते बोलणे ।
' ऐका ' ज्ञानदेवो म्हणे । निवृत्तीचा ।। 210।।

**इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानविज्ञानयोगो नाम सप्तममोऽ ध्यायः ।।7।।**

## कठीण ओव्यांचा अर्थ

40 खरोखर उत्पतीचे वेळी ते तत्व आकाशाच्या अंकुराने विस्तार पावते आणि अंतकाळी ॐकाराच्या पीठावरील अक्षरेही गिळून टाकते.

50 अशा प्रकारे वेदांनी गायलेल्या थोरपणाच्या मांडवावर जो कामविश्वाची वेल चढवितो की, तिच्यावर येणारी कर्माची पालवी फळभाराने वाकून अखेर मोक्षावर टेकते.

69 ती मायानदी निर्गुणरुपी पर्वताच्या तुटलेल्या कड्यातून मूळ संकल्परुप उसळीने उगम होऊन लागलीच तिच्यात पंचमहाभूतांचा लहानसा बुडबुडा आला.

70 ती मायानदी सृष्टीच्या विस्ताररुपी ओघाने व कालगतीच्या वेगाने वाढून कर्ममार्ग व मोक्ष मार्ग यांचे उंच काठ ओलांडून वाहते.

71 सत्वगुणरुपी मेघांची जोरदार वृष्टी झाल्यामुळे भ्रांतिरुप महापुराने ती यमनियमरुपी शहरे वाहून नेते

72 द्वेषरुपी भोवऱ्याने गच्च भरली असून मत्सररुप वळणे तिला पडली आहेत . तिच्यात अनवधानता इत्यादी मोठाले मासे तळपत अहेत.

तिच्यात प्रपंचरुपी बेटांची वळणे असून कर्माकर्माचा पूर येतो व तिच्यावर दुःखरुपी केरकचरा-पुराड तरंगत आहे.

73. तिच्यातील रतीच्या बेटावर कामरुपी लाटा आदळतात व त्या ठिकाणी जीव-समुदायरुपी पुष्कळ फेस एकत्र झालेला दिसत आहे .

75 अहंकाररुपी ओघ आहे व त्यावर विद्या,धन आणि सामर्थ्य या तीन मदांच्या चिळकांड्या येतात व विषयरुपी तरंगाच्या लाटाही उसळत अहेत.

76 तिच्यात उदय आणि अस्तरुपी लोंढे हे मरणाचे धोंडे पडून तेथे पंचभुतात्मक शरीररुप बुडबुडे उत्पन्न होतात व लयास जातात.

77 तिच्यात अविवेक व भ्रांती हेच कोणी मासे आहेत. ते सात्विक धैर्यरुपी आमिष गिळून टाकतात. त्या नदीत अज्ञानरुपी भोवरे वक्रगतीने फिरतात.

78 जे भ्रांतिरुप गढूळ पाण्याने आशारुप गाळात रुतले व रजोगुणाच्या खळाळाने स्वर्ग गर्जना होत असते.

79 तिच्यात तमोगुणरुपी मोठी धार असते व सत्वगुणरुपी स्थिर पाण्याचा सखोल डोह असतो. फार काय सांगावे! ही मायानदी तरुन जाण्यास अतीव अवघड आहे

80 हिच्यामधील पुनर्जन्मरुपी पुराचा लोंढा सत्यलोकाचे बुरुजावर आदळतो, आणि त्या आघातामुळे ब्रह्मांडरुपी धोंडे तेंव्हाच गडबडुन पडतात.

81 त्या पाण्याच्या वेगाने आजवर आलेला पूर ओसरत नाही. अरे! असा हा मायापूर कोण तरून जाईल.

82 आणखी येथे एक मोठेच नवल आहे! ते हे की, या नदीतून तरून जाण्याला जे जे म्हणून उपाय करावेत ते ते अपायच होतात. ते कसे ते ऐक.

83. कोणी स्वतःच्याच बुद्धिरुपी बाहुबळावर हिच्यामधून तरून जावे म्हणून हिच्यात उडी टाकतात. पण ते कोणीकडे गेले, त्याचा तर पत्ताच नाही. दुसरे कोणी ज्ञानरुपी डोहात, गर्वाने पार गिळून टाकले गेले.

84. कित्येकांनी वेदत्रयाच्या सांगडीचा आश्रय केला. पण त्यावर मीपणाचे धोंडे बांधून घेउन तरुन जाण्यास निघाले. ते मदनरुपी माशाच्या तोंडात सबंधच गेले.

85. कोणी तारुण्याच्या बळरुपी कासपेटा कमरेस कसून मदनाच्या कासेला लागले. तो त्यांना विषयरुप मगरीनेच चघळून टाकले.

86. मग ते वार्धक्यरुप लाटांमध्ये तरंगत जात असता मतिभ्रंशरुप जाळ्यात सापडतात, त्यायोगे चहूकडून जखडले जातात.

87. आणि शोकरुप कड्यावर आपटले जातात. पुढे क्रोधरुपी भोवऱ्यात गुरफटले असता त्यातून कोठे डोके काढतात तोच की, आपत्तिरुप गिधाडे त्यास टोचटोचून खाउ लागतात.

88. मग ते दुःखरुप चिखलाने माखले जातात व मग मरणाच्या वाळूत रुतले जातात. अशा प्रकारे जे कामाच्या मागे लागले ते असे फुकट जातात.

113. परंतु सामान्य जनांच्या नजरेला जशी स्फटिकाची शिला ( तीवरून वाहणाऱ्या पाण्याच्या चलनवलनाने ) क्षणमात्र पाण्यासारखी भासते, तसाच प्रकार या ज्ञानी पुरुषाचा होतो; हा कांहीं एक चमत्कारिक वर्णनप्रकार आहें असें नाही

114. वारा शांत होऊन आकाशात विरून गेला म्हणजे वेगळा भासमान होत नाही पण तो आकाशात असतो. त्याप्रमाणे ज्ञानी झाला म्हणजे वेगळेपणाने भक्ती करताना दिसला नाही तरी त्याचा भक्तपणा ही संज्ञा संपत नाही. त्याची सेवेची आस्था शिल्लक राहते.